# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
## दि.२५.६.२००९ रोजी झालेल्या मंडळाच्या २४२ व्या बैठकीतील ठराव.

**टिप :- ठराव क्र.२३८/२४८० मधील सुधारणा -**

श्री.सुर्यकांत तेली सचिव/मुंबई मंडळ यांनी,दि.२१/०१/०९ रोजीच्या मुंबई मंडळाच्या २३८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तात सासमीरा या संस्थेच्या आदर्शनगर,वरळी येथील प्रस्तावाबाबत करण्यात आलेल्या ठराव क्रं.२३८/२४८०,दि.२१/०१/०९ मध्ये मुद्दा क्र.३ मधील १.३३ चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये ०.४० चटई क्षेत्र निर्देशांक पर्यंत व्यापारी वापर करण्यास मान्यता देण्यात आली होती.या ऐवजी एकूण चटई क्षेत्र निर्देशांक २ पैकी ४० टक्के व्यापारी वापर करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.अशी सुधारणा करण्यात आली आहे.

**बाब क्रमांक २४२/२ : मुंबई शहर व उपनगरात मुंबई मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या व वितरणासाठी उपलब्ध होणा-या सदनिकांबाबतची माहिती.**

**ठराव क्रमांक :२४२/२५२३** दिनांक : २५/६/२००९

महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेने विनंती केल्याप्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध प्रस्तावित १७०० सदनिकांपैकी १५० सदनिका म्हाडा कर्मचा-यांना म्हाडा कायदा कलम १३(२) अंतर्गत राखुन ठेवून,शासनाची मान्यता घेण्यासाठी मुंबई मंडळ प्राधिकरणास शिफारस करीत आहे.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/३ : दादासाहेब गायकवाड नगर, मालाड येथील वसाहतीचे म्हाडा व पोलीस सहकारी गृहनिर्माण संघटनेसोबत संयुक्त पुनर्विकास प्रकल्प राबविणेबाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५२४** **दिनांक : २५/६/२००९**

१. महाराष्ट्र पोलीस हौसिंग फेडरेशनने डी.जी.नगर,मालवणीच्या आराखडयात दर्शविलेल्या भूखंड सी-१ वर (एकूण भूखंड सी भाग-) ९५४ गाळे बांधलेले आहेत.सदरहू फेडरेशनची योजना तेवढयापुरती सिमित करावी.९५४ गाळयांपैकी २१३ गाळे (२९.७४ चौ.मी. प्रती गाळा ) सुमारे १२००० चौ.मी.भूखंड सी-१ जागेच्या किंमतीच्या मोबतदल्यापोटी म्हाडाकडे ठराविक स्पेसिफिकेशन (Specification) नुसार विनामुल्य सुपूर्द करावेत,अशी शिफारस

मुंबई मंडळ करीत आहे.सदरहू २१३ गाळे प्राप्त झाल्यानंतर,नियमातील तरतूदी नुसार मुंबई मंडळामार्फत जाहिरात देवून वितरण करण्यात यावेत.

९५४ गाळयांपैकी उर्वरित ७४१ गाळे पोलीस हौसिंग फेडरेशन द्वारे मूळ उद्‌देशा नुसार योग्य लाभार्थिंना विक्री करण्याबाबत परवानगी देण्यात यावी.वरील गाळयांना महानगरपालिकेडून भोगवटा प्रमाणपत्र संस्थेने प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. आराखडयातील एकूण २३ हेक्टर जमिनीपैकी ( आराखडया / नकाशामध्ये दर्शविल्यानुसार) भूखंड क्र.सी पैकी,भूखंड क्र.सी-१ चे १.२० हेक्टर वगळून,वि.नि.वि. ३३(५) (१) अन्वये २.५ च.क्षे.नि.वापरुन विकास संयुक्त पध्दतीने करण्यास मान्यता देण्यात बाबत मुंबई मंडळ प्राधिकरणास शिफारस करीत आहे.मात्र,संयुक्त पध्दतीने विकास करण्यासाठी सदरहू जमीन म्हाडाकडे परत घेवून,नंतर प्राधिकरणाने निर्णय घ्यावा.

३. प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर,प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल.शासनाने संस्थेस जमिनीचे वाटप केले आहे.त्यामुळे,शासनाच्या मान्यतेनंतरच अंमलबजावणी करण्यात यावी.अशी शिफारस मुंबई मंडळ प्राधिकरणास करीत आहे.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/४ : मुंबई मंडळांतर्गत मोकळया भूखंडावर टर्न-की पध्दतीने निवासी, अनिवासी गाळयांचे बांधकाम करण्यासाठी पूर्व अर्हता प्राप्त ठेकेदारांकडून प्राप्त झालेल्या निविदा स्विकृतीबाबत.**

**कामांची नावे-**

**१.प्लॉट नं.७ टर्न की प्रकल्प उन्नत नगर,गोरेगांव.**

**२.प्लॉट नं.१० टर्न की प्रकल्प ऑफिस बिल्डींग नं.५ आणि ६ (बि.नं.६ च्या मागे),सिध्दार्थ नगर,गोरेगांव.**

**३.प्लॉट नं.२१टर्न की प्रकल्प ऑफिस बिल्डींग नं.२,आझाद नगर,अंधेरी-प.**

**४.प्लॉट नं.१,सर्व्हे नं.१५७,कांदिपली-प. आर.एस.सी.-२**

**५.प्लॉट नं.१६ चारकोप-४,आर.एस.सी.-२४**

**६.प्लॉट नं.१७ न्यु एम.एच.बी.कॉलनी,बि.नं.३८ च्या जवळ**

**७.प्लॉट नं.१८ जुनी एम.एच.बी.कॉलनी,बि.नं.९ च्या जवळ**

**८.(१९) मोकळा भूखंड (पोलीस स्टेशन,ग्राऊंड फ्लोअर) पी.एम.जी.पी.कॉलनी,मुलुंड**

**९.(२०) मोकळा भूखंड,(पोस्ट ऑफिस करीता) पी.एम.जी.पी.कॉलनी,मुलुंड.**

ठराव क्रमांक : **२४२/२५२५** दिनांक : २५.६.२००९

विषयात नमूद केलेल्या टर्न की पध्दतीने निवासी, अनिवासी गाळयांचे बांधकाम करण्यासाठी पूर्व अर्हता प्राप्त ठेकेदारांकडून प्राप्त झालेल्या सर्व (९+१४) निविदांबाबतची सविस्तर प्रस्तावाची बाब टिप्पणी मंडळाच्या पुढील बैठकीत मंडळाच्या अधिकारातील निविदांवर निर्णयासाठी व प्राधिकरणाच्या अधिकारातील शिफारसीसाठी आगामी बैठकीपुढे सादर करावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/५ : म्हाडा वसाहत पंतनगर घाटकोपर (पूर्व),मुंबई.७५ येथील इमारत क्र.१८४ मधील मूळ निवासी गाळा क्र.५०२० व ५०२२ चे वापर बदलाचे ना हरकत पत्र रद्द केल्याबाबत श्री.बजरंग व्ही.गवळी यांचा अर्ज.**

**ठराव क्रमांक : २४२/२५२६** दिनांक : २५/६/२००९

म्हाडा वसाहत पंतनगर घाटकोपर (पूर्व),मुंबई.४०० ०७५ येथील इमारत क्र.१८४ मधील मूळ निवासी गाळा क्र.५०२० व ५०२२ चे संदर्भात श्री.बजरंग व्ही.गवळी यांचे अर्जावर या प्रकरणात सुरु असलेली न्यायालयीन वस्तुस्थीती जाणून घेवून सक्षम स्तरावरील अधिका-याने (मुख्य अधिकारी) सदनिकेचा व्यावसायीक वापर पुर्न स्थापित करण्याबाबत निर्णय घेण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/६ : मुंबई मंडळातील वांद्रे विभाग व घाटकोपर विभागांतर्गत वसाहतीमधील मोकळया भूखंडावर वर्ष २००९-२०१० ते २०१०-२०११ या कालावधीसाठी राखण व पहारा कामाकरीता मागविण्यात आलेल्या निविदांवर निर्णय घेणेबाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५२७** दिनांक : २५/६/२००९

मुंबई मंडळाच्या वसाहतीमधील मोकळया भूखंडांचे २ वर्षे संरक्षणासाठी राखण व पहारा नेमण्यासाठी प्राप्त झालेले देकार स्पष्ट नसल्याने,त्या फेटाळून या कामाकरीता पुन्हा नव्याने निविदा मागविण्यात याव्यात.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/७ : वांद्रे रेक्लेमेशन, अे-ब्लॉक येथील रंगशारदा लगत आर.जी. करिता आरक्षित असलेला मोकळा भूखंड महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला अधिमुल्य आकारुन हस्तांतरीत करणेबाबत प्रस्ताव.**

**ठराव क्रमांक : २४२/२५२८** दिनांक : २५/६/२००९

वांद्रे रेक्लमेशन, अे-ब्लॉक येथील रंगशारदा नाटय मंदिराच्या लगत आर.जी. करीता आरक्षित असलेला **सूमारे ३७,०००-० चौ.मी.चा** मोकळा भूखंड महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास ''मुंबई-जत्रा'' या संज्ञेखाली विकसित करण्यास खालील अटी व शर्तीवर वितरीत करण्यात यावा,मात्र हा प्रस्ताव शासनाची मंजुरी घेण्यास प्रथम प्राधिकरणापुढे सादर करण्यास शिफारस आहे.

अ) स्पोर्टस ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांना सदर भूखंडाचे वितरण करण्याबाबतचा प्राधिकरणाने पूर्वी केलेला ठराव क्रं ६०६१ दिनांक ०७/०८/२००४ रद्द करावा व विषयांकित प्रस्तावावर निर्णय घेवून,आवश्यक ती शासनाची मंजूरी घ्यावी.

ब) या वितरणासाठी ठराव कं ६२६० दिनांक ०४/०६/२००७ नुसार प्रचलित वर्षाच्या रेडी रेकनर दराच्या १०% आकारणी करुन, (रुपये ५४०००/- प्रति चौ.मी. च्या १० टक्के - रु. ५४००/- ) भूखंडाचा दर एकूण रक्कम सुमारे रु.२० कोटी (तात्पुरती किंमत) राहिल. सदर भूखंडाच्या सिमांकनानुसार येणा-या क्षेत्रफळानुसार किंमत अंतिम करण्यात यावी.

क) प्राधिकरणाच्या ठराव कं ५५८० दिनांक ०५/०५/२००० च्या तरतूदीनुसार सदर खुली जागा वितरणाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच वसाहतीतील सहकारी संस्थांचे फेडरेशन यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

ड) मुंबई मंडळ / म्हाडाच्या विविध कामाकरिता प्रस्तावित संकुलातील स्टेडीयम वा प्रेक्षागृहाची व तेथिल खुले मैदान तथा जागा आवश्यकतेनुसार ०७ दिवसांच्या नोटीस कालावधीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने विनामूल्य वापरण्यास उपलब्ध करुन द्यावी.

ई) सदर भूखंडावर विकास नियंत्रण नियमानुसार अनुज्ञेय बांधकामाचे प्रस्ताव नकाशे म्हाडा व मुंबई महानगरपालिकेकडून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने मंजूरी प्राप्त करणे आवश्यक राहिल, त्याशिवाय बांधकाम करु नये.

फ) सदर जागेचा भाडे करार करताना विकास विषयक सर्व बाबींचा समावेश करून तो पर्यावरण व पर्यटन यांच्या वर्धनासाठीच असल्याबाबत खात्री करावी. कोणत्याही स्वरुपाचे व्यापारीकरण न करण्याचे तसेच,या योजनेसाठी आवश्यक त्या केंद्र व राज्य शासनाच्या विभागाची मंजूरी घेणे बंधनकारक करावे.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करण्यास मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/८ : इमारत क्र.५७, सिध्दार्थ नगर, उदका को.ऑप.हौ.सो.लि., सिध्दार्थनगर, गोरेगांव (पश्चिम) च्या पुनर्बांधणीस ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५२९** दिनांक : २५/६/२००९

इमारत क्र.५७, सिध्दार्थ नगर, उदका को.ऑप.हौ.सो.लि., सिध्दार्थनगर, गोरेगांव (पश्चिम) च्या पुनर्बांधणीस ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्तावावर आलेली श्री.पराडकर यांच्या तक्रारीची शहानिशा व दुकानाच्या बाबतची पुन्हा तपासणी करुन,प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/९ : जेव्हीपीडी या मुंबई मंडळाच्या वसाहतीतील न.भू.क्र.२६ (पैकी) वरील ४६३.६० चौ.मी.क्षेत्राच्या भूखंडावर खुल्या विकासाकरीता हस्तांतरणीय विकास हक्काचा वापर करण्यास ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५३०** दिनांक : २५/६/२००९

**जे.व्ही.पी.डी. या मुंबई मंडळाच्या वसाहतीतील न.भू.क्र. २६(पै) ४६३.६० चौ.मी. भूखंडावर खुल्या बाजारातून खरेदी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क स्वरुपातील अति.बांधकाम क्षेत्रफळ ३५०.०० चौ. मी. चे रहिवासी वापराकरिता प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० आणि ६३४९ अन्वये रेडीरेकनर दर रु. ३९००/- प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन ना हरकत प्रमाणत्र देण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.**

**संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.**

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

बाब क्रमांक २४२/१० : इमारत क्र.४२, नेहरु नगर, क्रांती को.ऑप.हौ.सो.लि. नेहरु नगर, कुर्ला (पूर्व) या इमारतीकरीता दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राबाबत.

**ठराव क्रमांक : २४२/२५३१** दिनांक : २५/६/२००९

इमारत क्र.४२, नेहरु नगर, क्रांती को.ऑप.हौ.सो.लि. नेहरु नगर, कुर्ला (पूर्व) **संस्थेला या कार्यालयाचे पत्र क्रमांक १८४२ दि. १८/०४/२००६ अन्वये रहिवासी वापराकरिता मंजूर अभिन्यासातील उर्वरित बांधकाम क्षेत्रफळ १७३५.६८८ चौ. मी. पैकी १९८.०० चौ.मी. वाणिज्य वापर बदलास प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये वाणिज्य वापराच्या दराची (रेडीरेकनर २००९ दराने च्या ६० टक्के दराने)आकारणी करावी तसेच उर्वरीत १५३७.६८८ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाचे सुधारीत दराने (रेडीरेकनर दर २००६ च्या ४० टक्के दराने ) आकारणी करुन फरकाच्या रक्कमेची वसुली करण्यास मान्यता देण्यात येत आहे.मात्र,विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीचा भंग होणार नाही,ही प्रमुख्य अट ठेवण्यात यावी.**

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/११ :** **इमारत क्र.१ ते ५ न्यू सिध्दार्थ नगर, पंचम को.ऑप.हौ. सौ.लि. सिध्दार्थ नगर, गोरेगांव (प) या इमारतीच्या पुनर्बांधणीकरीता ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत. (फेरसादर)**

**ठराव क्रमांक : २४२/२५३२** दिनांक : २५/६/२००९

इमारत क्रमांक १ ते ५ , सिध्दार्थ नगर पंचम को.ऑ.हौ.सो.ली., सिध्दार्थ नगर, गोरेगाव (पश्चिम) या संस्थेच्या खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) संस्थेच्या इमारती लगत असलेला ४५०.०० चौ.मी. क्षेत्रफळाची रस्त्याच्या सुरुपातील ना फूटकळ ना स्वतंत्ररित्या विकासयोग्य स्वरुपाची अति.जागेचे ( रस्त्याची जागा )वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनर दर २००९ अनुसार रुपये १५१२०/- ( रुपये २५२००/- च्या ६० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन आणि त्यावर आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी करुन वितरण करण्यास मुंबई मंडळ अनुमती देत आहे.

२) संस्थेच्या इमारती लगत असलेला ५७.८२ चौ.मी. क्षेत्रफळाची ना फूटकळ ना स्वतंत्ररित्या विकासयोग्य स्वरुपाची अति.जागेचे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनर दर २००९ अनुसार रुपये १५१२०/- ( रुपये २५२००/- च्या ६० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन आणि त्यावर आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी करुन वितरण करण्यास मुंबई मंडळ अनुमती देत आहे.

३) संस्थेच्या इमारती लगत असलेला ९०२.८० चौ.मी. क्षेत्रफळाची करमणूकीच्या मैदानाचे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये २५२०/- ( रुपये २५२००/- च्या १० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन आणि त्यावर आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी आणि अति. १८ महिन्याकरिता ८ टक्के दराने अति. भूईभाड्याची आकरणी करुन वितरण आणि नकाशामध्ये प्रस्तावित केल्यानुसार स्थलांतरणास करण्यास मुंबई मंडळ अनुमती देत आहे.

४) मंजूर अभिन्यासातील उर्वरित बांधकाम क्षेत्रफळ ५६०.००चौ.मी. ( प्रति गाळा १४ चौ.मी. x ४० गाळे ) चे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये १५१२०/- ( रुपये २५२००/- च्या ६० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करण्यास मुंबई मंडळ अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/१२ : पंतनगर, घाटकोपर (पूर्व) या वसाहतीतील कार्यालयीन इमारत क्र.२१ च्या पुनर्विकासाकरीता खुल्या बाजारातील हस्तांतरणीय विकास हक्क (टि.डी.आर.) चा वापर प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५३३** दिनांक : २५/६/२००९

कार्यालयीन इमारत क्रमांक - २१, पंतनगर, घाटकोपर (पूर्व्र) च्या पुनर्विकास प्रकल्पासाठी टि.डी. आर. स्वरुपातील ३७१.२५ .चौ. मी. या निवासी वापराकरिता रुपये ७२५/- प्रति चौ.मी. (प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनर -२००९ च्या ५ टक्के म्हणजेच रुपये १४५००/- च्या ५ टक्के ) आकारणी प्रस्तावास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन एकमताने मान्यता देण्यात येत आहे.

**१) सुधारीत वि.नि.नि. ३३ (५) नुसार २.५ चटईक्षेत्र वापराकरीता लेआऊट मंजुर झाल्यानंतर प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे जर कार्यालयीन इमारतींना २.५ चटईक्षेत्रानुसार उर्वरीत चटईक्षेत्र वाटपाची मंजुरी प्रदान केल्यास अर्जदार संस्थेस सदर**

**चटईक्षेत्राचे अधिमुल्य भरुन विकत घेणे बंधनकारक राहील तसे हमीपत्र मे.गांधी इस्टेट प्रा.लि. यांचेकडून प्राप्त करुन देकारपत्र देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.**

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २४२/१३ :** **भूखंड क्रमांक सी.टी.एस.क्र.४८५३/८५ स.क्र.३००/१५ सुंदर नगर सिध्देश को.ऑप.हौ.सो.लि. सुंदर नगर, सांताक्रुझ (पूर्व), या इमारतीच्या पुनर्बांधणीकरीता ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५३४** दिनांक : २५/६/२००९

**सुदंर नगर सिध्देश को.ऑ.हौ.सो.ली., सुंदर नगर, सांताक्रुझ (पूर्व) ) या संस्थेस**

अ) अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ७९२.०० चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ पुनर्बांधणी करण्याकरीता मुंबई मंडळ परवानगी देत आहे.

ब) इमारती पुनर्बांधणी प्रस्तावास अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ २६६.०० चौ.मी. ( १९.००चौ.मी. x १४ गाळे ) ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००६ नुसार रुपये १३६००/- ( रुपये १७०००/- च्या ८० टक्के दराने ) प्रति चौ.मी. रहिवासी दराने आकारणी करुन वितरण करण्यास मुंबई मंडळ परवानगी देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांकः- २४२/१४ इमारत क्रमांक ३,४ व ५ गोरेगाव पर्ल को.ऑ.हौ.सो.ली., सिध्दार्थनगर,गोरेगाव- (पश्चिम) या इमारतीच्या पुनर्बांधणी करिता ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५३५** दिनांक : २५/६/२००९

इमारत क्रमांक ३,४ व ५ गोरेगाव पर्ल को.ऑ.हौ.सो.ली., सिध्दार्थ नगर, गोरेगाव (पश्चिम) या संस्थेस

१. त्यांच्या इमारतीच्या लगत असलेला ५२१.८२ चौ.मी. क्षेत्रफळाची ना फूटकळ ना विकासास योग्य भूखंड स्वरुपाची अति.जागेचे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये १८१२०/- ( रुपये ३०२००/- च्या ६० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन आणि त्यावर आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी करुन वितरण करण्यास मुंबई मंडळ परवानगी देत आहे.

२. त्यांच्या इमारतीच्या लगत असलेला ६८२.५० चौ.मी. क्षेत्रफळाची करमणूकीच्या मैदानाचे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये ३०२०/- ( रुपये ३०२००/- च्या १० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन आणि त्यावर आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी आणि अति. १८ महिन्याकरिता ८ टक्के दराने अति. भूईभाड्याची आकरणी करुन वितरण आणि नकाशामध्ये प्रस्तावित केल्यानुसार स्थलांतरणास करण्यास मुंबई मंडळ परवानगी देत आहे.

३. त्यांच्या इमारती पुनर्बांधणी प्रस्तावास अतिरिक्त असलेल्या बांधकाम क्षेत्रफळ ८४०.०० चौ.मी. ( १४.००चौ.मी. x ६० गाळे ) ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००७ अनुसार रुपये २४१६०/- ( रुपये ३०२००/- च्या ८० टक्के दराने ) प्रति चौ.मी. रहिवासी दराने आकारणी करुन वितरण करण्याकरीता मुंबई मंडळ परवानगी देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब टिप्पणी :- २४२/१५ मौजे ओशिवरा-जोगेश्वरी येथे मुंबई मंडळाकडून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी यांना शाळेकरिता वितरीत झालेल्या भूखंडाच्या वाढीव चटई क्षेत्राबाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५३६** दिनांक : २५/६/२००९

मौजे ओशिवरा-जोगेश्वरी येथील न.भू.क्र.१पैकी असलेला एकूण सुमार ५०३७.६ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड,म्हाड (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९८२ चा विनियम - १६ अंतर्गत प्राप्त झालेल्या शासन आदेशान्वये दि. १२.१०.९० रोजी मंडळाकडून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेस शाळेकरीता वितरीत झालेल्या भूखंडावर मुंबई महानगर पालिकेच्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीमधील कलम ३३(२) नुसार शैक्षणिक वापराकरीता उपलब्ध होणा-या अधिकचा १ (एक) म्हणजे ५०३७.६ चौ.मी. चटई क्षेत्र निर्देशांक वारण्यास मुंबई मंडळ प्राधिकरण ठराव क्र.६२६० व ६३३० तरतुदीनुसार मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी. देकारपत्रात पुढील मुद्दा क्र.अ ते ड ची पूर्तता करण्याची अट घालण्यात यावी. या प्रकरणी शासनाच्या संबंधीत विभागाची मंजूरी आवश्यक असल्यास तसा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत शासनाकडे पाठवावा.

अ) अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ वापर ना हरकत प्रकरणी आवश्यक असलेली कागदपत्रं संस्थेने सादर केलेली नाहीत. आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी सोबत जोडली आहे.

त्यामधील अ.क्र. १,५,८,९ व १३ या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. (परिशिष्ठ -१)

ब) सद्या अस्तित्वातील इमारतीचे प्रमाणित नकाशे व आयओडी, सी.सी., ओ.सी. यांच्या प्रमाणित प्रती.

क) वाढीव बांधकाम प्रस्ताव प्रमाणित नकाशे व त्यामध्ये खालील तपशील दर्शविणे.

I) वापर निहाय बांधकाम क्षेत्रफळ तपशील उदा. प्राथमिक शाळा क्षेत्रफळ, माध्यमिक शाळा क्षेत्रफळ, उच्च माध्यमिक वापर क्षेत्रफळ, उच्च शिक्षण व्यवस्थेकरिता वापरात येणारे बांधकाम क्षेत्रफळ व इतर अनुज्ञेय वापर, वाणिज्य-बँक, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचे दुकान इ.

II) वाढीव इमारत प्रस्ताव नकाशे हे मुंबई मनपा मंजूरीच्या सादरीकरणाचे असावेत.

ड) नकाशा छाननीनुसार नकाशावर खालील तपशील उपलब्ध असणे आवश्यक आहे.

I) शाळेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्याचे नकाशे.

II) भूखंड क्षेत्रफळ, अनुज्ञेय च.क्षे.नि. अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळ इत्यादी तपशीलाचा तक्ता (Area Statement) इत्यादी सहितचे नकाशे.

III) विकास नियोजन शेरे.

IV) भूखंड एम.एम.आर. क्षेत्रातील असून, मुंबई मनपाच्या विकास आराखडयानुसार माध्यमिक शाळेकरिता दर्शविलेला आहे.तदनुसार उच्च शिक्षण व्यवस्था प्रकरणी एज्युकेशन बोर्डाचे ना हरकत प्रमाणपत्र.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांकः- २४२/१६ इमारत क्रमांक ९०, टिळक नगर ज्वाला को.ऑ.हौ.सो.ली., टिळक नगर चेंबुर या इमारतीच्या पुनर्बांधणीकरिता ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबत.**

**ठराव क्रमांक : २४२/२५३७** दिनांक : २५/६/२००९

**इमारत क्रमांक ९०, टिळक नगर ज्वाला को.ऑ.हौ.सो.ली. टिळक नगर, चेंबुर या संस्थेस**

१. त्यांच्या इमारतीच्या लगत असलेला १६४.२५ चौ.मी. क्षेत्रफळाची फूटकळ भूखंड स्वरुपाची अति.जागेचे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये ८५८०/- ( रुपये १७१००/- च्या ५० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन आणि त्यावर आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी करुन वितरण करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. संस्थेच्या इमारतीच्या लगत असलेला ११२.६० चौ.मी. क्षेत्रफळाची ना फूटकळ ना स्वतंत्ररित्या विकासयोग्य स्वरुपाची अति.जागेचे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये १०२६०/- ( रुपये १७१००/- च्या ६० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करुन आणि त्यावर आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी करुन वितरण करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. संस्थेच्या इमारतीच्या लगत असलेला ३६०.७७ चौ.मी. क्षेत्रफळाची करमणूकीच्या मैदानाचे वितरण प्राधिकरण ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये १७१०/- ( रुपये १७१००/- च्या १० टक्के दराने ) प्रति चौ.मी. दराने आकारणी करावी.

४. वरील प्रमाणे आवश्यक भूईभाड्याची भांडवलीकरणासह आकारणी आणि अति. १८ महिन्याकरिता ८ टक्के दराने अति. भूईभाड्याची आकरणी करुन वितरण आणि नकाशामध्ये प्रस्तावित केल्यानुसार स्थलांतरण करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

५. संस्थेच्या इमारती पुनर्बांधणी प्रस्तावास अतिरिक्त असलेल्या बांधकाम क्षेत्रफळ ८८२.०० चौ.मी. ( २४.५०चौ.मी. x ३६ गाळे ) ठराव क्रमांक ६२६० अन्वये रेडीरेकनगर दर २००९ अनुसार रुपये ६८४०/- ( रुपये १७१००/- च्या ४० टक्के दराने ) प्रति चौ.मी. रहिवासी दराने आकारणी करुन वितरण करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकारपत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच करारपत्रातील सुधारणा करावी.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.